
**Madhuri Rakhunde: Deshantrgat Rajkarnat Rajkiya Pakshyanchi stithi**



ISBN 978-81-939083-4-1

# भारतीय राजकारण

भारतीय राजकारणावरील विविध शाखांच्या अध्यापकांनी
घेतलेल्या संशोधनपर लेखांचा संपदित ग्रंथ

संपादन
डॉ. अनिल विश्वास

टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

मूल्य दोनशे रुपये

- ISBN 978-81-939083-4-1
- भारतीय राजकारण
  Bhartiya Rajkaran
- संपादन
  डॉ. अनिल विश्वास
- सर्व हक्क सुरक्षित
- प्रथमावृत्ती १ ऑगस्ट, २०१९
- प्रकाशन क्र. २४
- प्रती ५००
- आकार डेमी
- प्रकाशक
  टिआरा पब्लिकेशन्स
  दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
  कोथरूड, पुणे ४११०२९
  tiarapublication@rediffmail.com
- मूल्य २०० रुपये

(या ग्रंथात प्रकाशित विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | महाराष्ट्र १९६० ते २०१९ राजकीय प्रवास | प्रा.डॉ. संजना तांशेरे | 84-86 |
| 26 | महिला सक्षमीकरण | डॉ. पवन मांडवकर | 87-88 |
| 27 | देशांतर्गत राजकारणात राजकीय पक्षांची स्थिती | प्रा.डॉ. माधुरी राखुंडे | 89-92 |
| 28 | स्त्री समस्यांची सद्य:स्थिती | कु. संगीता बाखडे | 93-96 |

# देशांतर्गत राजकारणात राजकीय पक्षांची स्थिती

प्रा.डॉ. माधुरी राखुंडे
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.यवतमाळ

## प्रस्तावना :—

भारतीय पक्ष पध्दतीने वर्गीकरण विशिष्ट प्रकारात करणे ही अत्यंत अवघड बाब आहे. पाश्चिमात्य देशामध्ये आढळणा—या कोणण्यात प्रकारच्या चौकटीत इथली पक्षव्यवस्था बसु शकत नाही. खरे तर पाश्चात्य अर्थाने या देशात पक्षपध्दतीच अस्तित्वात नाही. पाश्चिमात्य राजकीय संस्था जरी भारताच्या घटनाकारांनी स्विकारल्या तरी त्या संस्थाच्या बरोबर त्या देशांमध्ये विकसित झालेल्या पध्दती इथे आणु शकले नाहीत. जगातील इतर देशासारख्या पक्षपध्दतीची उणीव ही अशीच एक गोष्ट आहे, ज्या समाजात राजकीय व्यवस्था उत्क्रांत होत जाते त्या समाजातविचारसणी कमश: आकार प्राप्त होत जातो आणि एका विचारसरणीतुण पक्ष आकाराला येत जाते. जसा मतदानाचा अधिकार कमाकमाने वृध्दीगंत होत गेला तसा भारतात झालेला नाही. त्यामुळे येथील या संघटनेमध्ये एक प्रकाराचा सैलपणा व त्यांचा वर्तनात अनिश्चितता निर्माण होते. राजकीय पक्ष म्हणुनच. निश्चित सुसंगत स्वरूप या देशात धारण करू शकत नाहीत. आज अस्तित्वात असलेले राजकीय पक्ष नष्ट झाले तरच आदर्श भारतीय राज्य व्यवस्था अस्तित्वात येऊ शकेल, असा ठाम विश्वास बाळगणारे काही विचारवंत आजही या देशात आढळतात. महात्मा गांधीजीची ग्रामराज्य कल्पना पक्षविरहीत आहे. जयप्रकाश नारायण यानाही पक्षविरहीत राज्यव्यवस्थाच भारतासाठी अत्युत्तम ठरेल असे वाटत होते. रॅडिकल हुमॅनिस्टांचेही असेच मत आहे. राजकीय पक्ष अनावश्यक नव्हे तर अहितकारक आहेत.

## रिचर्ड एल. पार्कच्या मते :—

''स्वातंत्र चळवळ ऐकुनच पाश्चात्य धर्तीच्या पक्षपध्दतीला जन्म देण्यास प्रतिकुल ठरते. साम्राज्यवादी सत्ताधीशाला विरोध करण्यासाठी व स्वातंत्रप्राप्तीसाठी सगळे गट कटिबध्द होऊन एका संघटनेत जमतात... पुन्हा स्वातंत्र प्राप्तीनंतर ते फुटतात..... त्याच्यातुन लहाण— लहाण राजकीय वर्तुळ निर्माण होतात'' भारतात अशा प्रकारचे राष्टीय चळवळीचे रूपांतर राजकीय पक्षात झाले आहे. स्वातंत्र पुर्वकाळात इंग्रजी राजवटीला संघटीत प्रतिकार करण्यासाठी या देशातील सगळे हितसंबंध एका कॉग्रेसच्या ध्वजाखाली उभे राहीले होते. सुरूवातीला एक दबाव गट म्हणुन अस्तित्वात आलेली ''इंडियन नॅशनल कॉग्रेस''१९१९ पर्यत दबाव गट म्हणुन कार्यरत होती. टिळकांच्या नेतृत्वाखाली जरी पुर्वीपेक्षा तिचा पाया अधिक व्यापक झाला असला तरी गांधीच्या नेतृत्वाखाली उदय होईपर्यत ती ख—या अर्थाने लोकाभिमुख झालीच नव्हती.

या सुमारात जागतिक घडामोडीं मधुन काही प्रवाह उदभवले की, ज्याच्यामुळे कॉग्रेंसला राष्ट्रीय मुक्ती चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. उदा: रशियात बोल्शेविक कांती यशस्वी झाली. प्रथम महायुध्दामुळे साम्राज्यशाहीला उतरती कळा लागली, यापुढे स्वातंत्र प्राप्तीपर्यत कॉग्रसचे हे चळवळीचे स्वरूप कायम राहीले. सर्व क्षेत्रातील व्यक्तींना सर्व थरातील वर्गाना व सर्व प्रकारच्या हितसंबंधांना सामावणा—या चळवळीचे हे स्वरूप या ''चळवळीचा'' स्वातंत्रायोत्तर काळात ''पक्ष''झाला तरी पुर्णपणे कधीच नाहीसे होऊ शकले नाही. पक्ष म्हणुन आपली कारकीद कॉग्रसने तशी स्वातंत्रपुर्व काळात म्हणजे १९३६ पासुनच सुरू केली होती, पण स्वातंत्र नंतर राजकीय पक्ष म्हणून कार्य केली.

स्वांतत्योत्तर काळात अखंड तीस वर्षा पर्यत भारतातील कॉग्रेस पशाचे स्थान केवळ भारतीय पक्षपध्दतीत नव्हे तर एकदरीत जगाच्या पक्षपध्दतीमध्येच अद्वितीय होते. इतर देशांमधील काही साम्यवादी पक्षाचा अपवाद वगळता हा कदाचित जगातला सर्वात मोठा राजकीय पश ठरावा असे कृष्ण मेनन एकदा मायकेल ब्रेशासी बोलतांना म्हणले होते की ''कॉग्रेस पक्षाचे सर्वात मोठे सामर्थ्य यात आहे की त्याला जनतेच्या हद्‌यात स्थान आहे. त्याची जागाकॉग्रेस पक्षाने घेतली आहे''

## कॉग्रेसपक्षाचे स्थान :—

१. स्वातंत्र्यानंतर याच पक्षाचे प्राबल्य संपुर्ण देशात होते.
२. १९६७ च्या निवडणुकीत या पक्षाला पराभव पत्करावा लागला तसेच समाजवाद विरूध्द उजव्या प्रतिगामी शक्ती उदयास आल्यामुळे अशी स्थिती निर्माण झाली.